Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VI June 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे लिंग गुणोत्तर निम्न असल्याची कारणमीमांसा: विशेष संदर्भ बीड जिल्हा (महाराष्ट्र)

**अंबादास कर्डीले**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

*भारतीय कुटुंबव्यवस्था आणि कुटुंबातील स्त्रियांना मिळणारा मान-सन्मान हा पाश्चात्य व्यवस्थेवर आधारित बदलत चाललेला आहे.असे असतानाही आपल्याकडील स्त्री-पुरुष समतोल मात्र दिवसेंदिवस ढासळताना दिसत आहे.हे २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीवरून अधिक स्पष्टपणे दिसून येते.याबाबत महाराष्ट्र व मराठवाड्यातील जिल्ह्यांचा विचार केला तर २००१ ते २०११ या काळात बाल लिंग गुणोत्तरात (० ते ६ वर्षे) सर्वाधिक घट ही बीड जिल्ह्यात झालेली आहे या अनुषंगानेच लिंग गुणोत्तरातील ढासळत्या प्रमाणाच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत संशोधनात करण्यात आलेला आहे.*

**प्रस्तावना :**

मानवी समाजात स्त्री-पुरूष हे एकमेकांशिवाय अपुर्ण आहेत. हे सत्य कुणीही नाकारु शकत नाही. निसर्गाने प्रत्येक गाष्टीवर काही मर्यादा घालून दिलेल्या आहेत. परंतू निसर्गाने घडविलेल्या या चक्रावर स्त्री भ्रूण हत्या करुन त्यावर मात करण्याचा प्रयत्न मनुष्य करु पाहात आहे. स्त्रीभ्रूण हत्यांमुळे स्त्री-पुरूषांच्या प्रमाणातील वाढणारा असमतोल हा मानव समाजाला धोकादायक ठरणारा असून तो मानवी समाजासमोर एक आव्हान ठरु पाहत आहे. आज स्त्री-पुरूष प्रमाणात निर्माण झालेला असमतोल हा स्त्रियांच्या समस्यांशी निगडीत असलेला एक महत्त्वाचा घटक म्हणवा लागेल. कोणत्याही समाजात स्त्री-पुरूष यांचे प्रमाण साधारणत: सारख्या प्रमाणात असावे. मात्र गेल्या काही वर्षात हे प्रमाण पाहिले तर बरीच तफावत असल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब ठरत असून या समस्येचे सामाजिकदृष्टया मानवी जिवनावर अनेक दुष्परिणाम होताना दिसून येत आहेत.

समाजाचे सात्यत व समाजस्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी स्त्री व पुरूष यांचे प्रमाण नैसर्गिकरित्या संतुलित ठेवणे आवश्यक आहे. स्त्री-पुरूषांच्या संतुलित प्रमाणामुळे समाजाची सुदृढ व निकोप वाढ होत असते. म्हणुनच राममनोहर लोहिया यांनी विकास करण्यासंदर्भात 'नारी के सहयोग बीना हर बदलाव अधुरा है!' असा नारा दिला होता. म्हणजेच स्त्रीच्या अस्तित्वाशिवाय समाजाची संकल्पना अर्धवट आहे. समाज व्यवस्था कायम करणे, ती टिकविणे व तिच्यात नवनविन परिवर्तन घडवून आणने यासाठी स्त्रीचे अस्तित्व अत्यंत महत्त्वाचे आहे. २०११ च्या भारतीय जनगणना अहवालानुसार देशातील ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंगगुणोत्तराने तर धोक्याची घंटा दिली आहे. यामुळे भारतातील कोणत्याही संवेदनशील नागरिकास विचार करण्यास भाग पाडणारी ही समस्या असून भविष्यात अधिक गंभीर होत जाणार आहे. अलिकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर अनेक संकल्पना बदलत असून नवनविन समस्या निर्माण होत आहेत. ज्यांचे दुष्परिणाम समाजाच्या स्थैर्यावर सातत्याने होताना दिसतात. त्यातीलच एक महत्त्वाची व चिंतणीय वाटणारी बाब म्हणजे दिवसेंदिवस कमी होत जाणारी मुलींची संख्या होय. यासाठी जबाबदार घटकांपैकी एक वैधक तंत्रज्ञान असून त्याचा मोठया प्रमाणात दूरुपयोग होत आहे. त्यामुळे मुलींचा घटता जन्मदर व त्याचा स्त्री-पुरूष प्रमाणावर पडणारा प्रभाव या असमतोलाचा समाजावर विपरीत प्रभाव पडत असून ही एक गंभीर सामाजिक समस्या संशोधनात्मक दृष्टीकोणातून अभ्यासून तिची शास्त्रशुध्द मांडणी करणे सद्यस्थितीत गरजेचे वाटते.

समाजस्तरावर स्त्रियांची संख्या कमी होण्यामागे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय तसेच संस्कृतीक घटकही कारणीभूत आहेत. याद्वारे स्त्रीला दिल्या जाणाऱ्या वागणुकीमुळे असुरक्षितता निर्माण होते व स्त्रीचा जन्म नाकारला जातो. स्त्री भ्रुणहत्या, स्त्रियांवर होणारे अत्याचार यामुळे लिंग गुणोत्तरात दिवसेंदिवस असमतोल निर्माण होत असून हा असमतोल दुर करणे, स्त्री अस्तीत्वाबद्दलची संवेदना जागृत करणे हे आजच्या गतिमान समाजा समोरील एक मोठे आव्हान आहे.

**तक्ता क्र. १**

**भारतातील काही राज्यातील ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण**

| अ.क्र | राज्य | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
| १ | हिमाचल प्रदेश | ९७१ | ९५१ | ८९७ | ९०६ |
| २ | हरियाणा | ९०२ | ८७९ | ८२० | ८३० |
| ३ | पंजाब | ९०८ | ८७५ | ७९३ | ८४६ |
| ४ | राजस्थान | ९५४ | ९१६ | ९०९ | ८८६ |
| ५ | गुजरात | ९४७ | ९२८ | ८७८ | ८८६ |
| ६ | महाराष्ट्र | ९५३ | ९४६ | ९१३ | ८८३ |

**स्त्रोत :** भारत जनगणना, २०११

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंगगुणोत्तर प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. तसेच पुरोगामी राज्य समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातही लिंगगुणोत्तर प्रमाण हे झपाटयाने कमी झाले आहे. १९९१ साली ९४६ असलेले लिंग गुणोत्तर प्रमाण २००१ साली ९१३ व २०११ साली ८८३ अशा वेगाने दोन दशकाच्या काळात कमी झाले आहे. तर २०११ साली महाराष्ट्रातील सरासरी प्रमाणापेक्षाही मराठवाडयातील ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंगगुणोत्तर हे ८५६ एवढे कमी आढळून आले आहे.

**तक्ता क्र. २**

**मराठवाडयातील जिल्हानिहाय ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण**

| अ.क्र. | जिल्हा | २००१ | २०११ | २००१ ते २०११ दरम्यानची तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ८९० | ८४८ | ४२ |
| २ | जालना | ९०३ | ८४७ | ५६ |
| ३ | बीड | ८९४ | ८०१ | ९३ |
| ४ | उस्मानाबाद | ८९४ | ८५३ | ४१ |
| ५ | परभणी | ९२३ | ८६६ | ५७ |
| ६ | हिंगोली | ९२७ | ८६८ | ५९ |
| ७ | लातूर | ९१४ | ८७२ | ४६ |
| ८ | नांदेड | ९२९ | ८९७ | ३२ |
| | **महाराष्ट्र** | **९१३** | **८८३** | **३१** |

**स्त्रोत:** महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२

२००१ ते २०११ या दशकात महाराष्ट्र राज्यासह मराठवाडयातील सर्व जिल्हयातील ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण घटले असून ते महाराष्ट्र (८८३) राज्यापेक्षा कमी आहे. यामध्ये सर्वाधिक घट बीड (९३) जिल्हयातील असून त्याखालोखाल हिंगोली (५९), परभणी (५७), जालना (५६), लातूर (४६), औरंगाबाद (४२), उस्मानाबाद (४१) व नांदेड (३२) या जिल्हयाचा क्रमांक लागतो. मराठवाडयातील सर्व जिल्हयातील घट महाराष्ट्र (३१) राज्यापेक्षा जास्तीची असून ही एक चिंताजनक बाब आहे. म्हणूनच मराठवाडयातील बीड जिल्हयातील ० ते ६ वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाणाच्या कारणांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधन उदिष्टे :**

- बीड जिल्ह्यातील २००१ ते २०११ या काळात ० ते ६ वर्ष वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाणात झालेल्या बदलाचे विश्लेषण करणे.
- बीड जिल्ह्यातील ० ते ६ वर्ष वयोगटातील घटत्या लिंग गुणोत्तर प्रमाणाच्या कारणांचा अभ्यास करणे.
- स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल राखण्याच्या दृष्टीकोणातुन लिंग गुणोत्तर प्रमाण वाढीसाठी उपाय योजना सुचवणे.

**संशोधन गृहीतकृत्ये :**

- बीड जिल्ह्यातील ० ते ६ वर्ष या वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण हे राज्याच्या इतर भागापेक्षा सर्वात कमी असून त्यामध्ये २००१ ते २०११ या काळात सर्वाधिक घट झालेली आहे.
- असंतुलित लिंग गुणोत्तर प्रमाणाचा समाजावर दुष्परीणाम होतो.
- लिंगगुणोत्तर प्रमाण निम्न असण्यामागे समाजाची स्त्रियांप्रती असणारी नकारात्मक मानसिकता आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत संशोधनात बीड जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील घटत्या लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास करण्यात आलेला असून त्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आलेला असून द्वितीय स्त्रोतांमध्ये विविध अहवाल, लेख, मासिके, संशोधन अहवाल, संदर्भग्रथ, वृत्तपत्रे व इंटरनेट यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तूत संशोधनामध्ये असंभाव्यता नमुना निवड (Non Probability) प्रकारातील सहेतूक नमुना निवड (Purposive Sampling) पध्दतीचा वापर करण्यात आलेला असून त्याद्वारे बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील ०५ गावांतून प्रत्येकी दहा याप्रमाणे एकूण ५० प्रतिसादकांची निवड करण्यात आलेली आहे.

**तथ्य विश्लेषण व निर्वचन :**

बीड जिल्ह्यातील बाल लिंग गुणोत्तराचा (० ते ६ वर्षे) अभ्यास करताना लिंग गुणोत्तर कमी होण्यामागील कारणांबाबत जिल्ह्यातील १५ ते ४५ या वयोगटातील स्त्रियांची मानसिकता जाणून घेतली. त्यामध्ये पुढील मुद्दयांवर चर्चा करण्यात आली.

**१. कुटुबांमधील स्त्रियांचे स्थान :**

**तक्ता क्र. ०३**

**कुटुंबातील स्त्रियांचे स्थान दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | स्त्रियांचे स्थान | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबामध्ये स्त्रियांना मानाचे स्थान दिले जाते. | १६ | ३२ |
| २ | मानाचे स्थान दिले जात नाही. | २४ | ६८ |
| एकूण | | ५० | १०० |

उपरोक्त तक्त्यावरून असे निर्दशनास येते की, बीड जिल्ह्यातील जवळपास ६८ टक्के कुटुंबामध्ये स्त्रियांना कसल्याही प्रकारचें महत्व दिले जात नाही. यावरूनच आपणांस पुरुषी मानसिकता व महिलांना दिले जाणारे महत्व लक्षात येते. स्त्री भ्रुण हत्या वाढण्यामागे हे सुद्धा एक कारण आहे.

**०२. अपत्य जन्माबाबतचा निर्णय :**

**तक्ता क्र. ०४**

**तुमच्या स्वत:च्या अपत्य जन्माबाबतचा निर्णय कोण घेते**

| अ. क्र. | अपत्य जन्माबाबतचा निर्णय | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तुम्ही स्वत: (स्त्री) | ०४ | ०८ |
| २ | पती | १२ | २४ |
| ३ | पती - पत्नी दोघे मिळून | १० | २० |
| ४ | कुटुंबातील इतर सदस्य | २४ | ४८ |
| एकूण | | ५० | १०० |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, कुटुंबामधील अपत्य जन्माबाबतचा निर्णय कुटुंबातील सर्व सदस्यांच्या संमतीने (४८ टक्के) घेतला जातो. तर याबाबत फक्त पतीने निर्णय घेण्याचे प्रमाण २४ टक्के असून २० टक्के निर्णय पती-पत्नी दोघे मिळून घेतात तर स्त्री ला स्वतंत्र निर्णय घेण्याची प्रमाण फक्त ०८ टक्के आहे.

यावरूनच असे लक्षात येते की, आजच्या २१ व्या शतकातील पुढारलेल्या काळातही स्त्रियांना स्वतःच्या अपत्य जन्माबाबत निर्णय घेण्याचा आधिकार स्वतःला नाही.

**०३. होणारे अपत्य मुलगाच असावा ही प्रबळ इच्छा :**

**तक्ता क्र. ०५**

**होणारे अपत्य हे मुलगाच असावा ही प्रबळ इच्छा दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | होणाऱ्या अपत्याबाबत अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुलगी असावी | ०७ | १४ |
| २ | मुलगा असावा | १६ | ३२ |
| ३ | मुलगी/मुलगा काहीही चालेल | २७ | ५४ |
| | **एकूण** | ५० | १०० |

उपरोक्त तक्त्यावरून असे निर्देशनास येते की, होणारे अपत्य हे मुलगाच असावा ही प्रबळ इच्छा असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३२ टक्के असून मुलगी व्हावी ही इच्छा असणारे प्रतिसादक तुलनेने कमी (१४ टक्के) आहेत. तर मुलगी/मुलगा या दोघांनाही पसंती देणारे ५४ टक्के प्रतिसादक आहेत. थोडक्यात आजच्या काळातही मुलगाच हवा ही मानसिकता कमी झालेली नाही.

**०४. किमान एक तरी मुलगा हवा :**

**तक्ता क्र. ०६**

**किमान एक तरी मुलगाच असावा ही इच्छा दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | अपत्याबाबत अपेक्षा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | किमान एक तरी मुलगा असावा | ४२ | ८४ |
| २ | मुलगा असावाच असे नाही | ०८ | १६ |
| | **एकूण** | ५० | १०० |

उपरोक्त तक्त्यावरून असे निर्देशनास येते की, आपणांस किमान एक तरी मुलगा हवा ही अपेक्षा असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ८४ टक्के आहे. तर मुलगा / मुलगी असे प्राधान्य नसलेल्या प्रतिसादकांची संख्या १६ टक्के एवढी अत्यल्प आहे. यावरूनच असे स्पष्ट होते की, आजही मुलींच्या तुलनेत मुलांना जास्तीचे प्राधान्य दिले जात आहे.

**निष्कर्ष :**

बीड जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे लिंग गुणोत्तर निम्न असल्याच्या कारणांचे अध्ययन केल्या नंतर प्रामुख्याने खालील निष्कर्ष दिसून येतात.

- बीड जिल्ह्यातील जवळपास ६८ टक्के कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कसल्याही प्रकारचें महत्व दिले जात नाही. यावरूनच आपणांस पुरुषी वर्चस्व दिसून येते. हे सुद्धा स्त्री भ्रुण हत्या वाढण्यामागे व लिंग गुणोत्तर कमी होण्याचे महत्वाचे कारण आहे.
- अपत्य जन्माबाबतचा स्वतंत्र निर्णय घेण्याचा फक्त ०८ टक्के स्त्रियांना आधिकार आहे. यावरूनच असे लक्षात येते की, आजच्या २१ व्या शतकातील पुढारलेल्या काळातही स्त्रियांना स्वतःच्या अपत्य जन्माबाबत निर्णय घेण्याचा आधिकार स्वतःला नाही.
- मुलगाच असावा ही प्रबळ इच्छा असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३२ टक्के आहे. म्हणजेच आजच्या काळातही मुलगाच हवा ही मानसिकता कमी झालेली नाही.१
- आपणांस किमान एक तरी मुलगा हवा ही अपेक्षा असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ८४ टक्के आहे. यावरूनच असे स्पष्ट होते की, आजही मुलींच्या तुलनेत मुलांना जास्तीचे प्राधान्य दिले जात आहे.

**उपाययोजना :**

कुटुंब व्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान उंचावण्याच्या दृष्टिकोनातून व लिंग गुणोत्तरामध्ये समानता आणण्यासाठी पुढील उपाययोजना परिणामकारक ठरतील.

- ✓ गर्भलिंग निदान प्रतिबंधक व बालविवाह यासारख्या कायद्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे.
- ✓ मुलींनाच वंशाचा दिवा म्हणून स्विकारण्यासाठी समाजाची मानसिकता बदलविणे.
- ✓ प्रत्येक दाम्पत्याची विवाह नोंदणी करणे बंधनकारक करणे.
- ✓ समाजाच्या मत परिवर्तनासाठी विविध शिबीरे, चर्चासत्र, पथनाट्य, निबंध स्पर्धा या सारख्या कार्यक्रमातून जनजागरण करणे.
- ✓ स्त्री - भ्रूण हत्येविषयी माहिती देणाऱ्यास बक्षीस देणे.
- ✓ जननी सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना, सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना यांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

**संदर्भ सूची :**

१. आगलावे, डॉ. प्रदिप (२००७) सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, साईनाथ प्रकाशन धरमपेठ, नागपूर
२. भारत सरकार, जनगणना २०११
३. महाराष्ट्र शासन, लोकराज्य २०११
४. महाराष्ट्र शासन, (२००२) महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२
५. ज.श. आपटे, महाराष्ट्राची लोकसंख्या नियोजन व विकास.
६. नियोजन विभाग, भारत सरकार, योजना मासिक (जुलै २०११)
७. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (२०१२), महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ : सर्वसमावेशक मानव विकासाकडे, रिप्रो व्हिजन प्रिंटर्स प्रा. लि., पुणे
८. Manavlok College of social sciences, Ambajogai, Beed. (२०१३) National seminar on "Declining Girls Ratio and Society"